दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | शुक्रवार, दि. ११ सप्टेंबर २०२६ | वर्ष - १ | अंक - ३४४ | पाने - ४

पुणे/पिंपरी-चिंचवड

### आजचे पंचांग

दिनांक : ११ सप्टेंबर २०२६ वार : शुक्रवार माह (अमावस्यांत) : श्रावण माह (पूर्णिमांत) : भाद्रपद ऋतु : शरद आयन : दक्षिणायन पक्ष : कृष्ण पक्ष तिथी : अमावस्या तिथी (सकाळी ०८:५६ पर्यंत) त्यानंतर प्रथम तिथी नक्षत्र : पूर्वा फाल्गुनी नक्षत्र (दुपारी ०१:१५ पर्यंत) त्यानंतर उत्तरा फाल्गुनी नक्षत्र योग : साध्य योग (सायंकाळी ०५:०१ पर्यंत) त्यानंतर शुभ योग करण : नागवा करण (सकाळी ०८:५६ पर्यंत)

### भाजप आमदाराच्या शाळेचा अजब फतवा!

**पुणे :** भाजप आमदार नरेंद्र मेहता यांच्या शाळेतील एका निर्णयावरून वाद निर्माण झाला आहे. विद्यार्थ्यांच्या डब्यात कांदा, लसूण, बटाटा, बीट तसेच कंदमुळांच्या भाज्या आणण्यास मनाई करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. एवढेच नाही, तर शाळेच्या कॅन्टीनमध्येही या पदार्थांवर बंदी घालण्यात आली आहे. यासंदर्भातील नोटीस पालकांना व्हॉट्सअॅप ग्रुपद्वारे देण्यात आली आहे. जैन समाजाचा आठ दिवसीय पर्युषण पर्व सुरू असल्याने शाळेकडून हे निर्देश देण्यात आल्याची चर्चा आहे. मात्र, विविध समाज आणि धर्मातील विद्यार्थी शिक्षण घेत असलेल्या शाळेत अशा प्रकारचे निर्बंध का घालण्यात आले, असा सवाल आता पालकांकडून उपस्थित केला जात आहे.

### सारांश वृत्त

## आज देशव्यापी बँक संप; ११ ते १४ सप्टेंबर सेवा विस्कळीत होण्याची शक्यता!

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
हैद्राबाद | प्रतिनिधी

देशभरातील बँक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या प्रभावी संघटनांनी आज, शुक्रवार ११ सप्टेंबर २०२६ रोजी एकदिवसीय देशव्यापी बँक संपाची हाक दिली आहे. संपामुळे आज बँक शाखांमधील नियमित कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता असून, त्यानंतर शनिवार-रविवार आणि पुढील सुट्टी यामुळे अनेक ठिकाणी ११ ते १४ सप्टेंबरदरम्यान सलग चार दिवस शाखा सेवा प्रभावित राहू शकतात. संप गुरुवारी, १० सप्टेंबरच्या मध्यरात्री सुरू होऊन आज, ११ सप्टेंबरच्या मध्यरात्रीपर्यंत प्रस्तावित आहे. संप प्रत्यक्षात झाल्यास शाखांमधील काउंटरवरून रोख रक्कम काढणे, धनादेश जमा करणे, तसेच गृहकर्ज, वाहनकर्ज आणि सोनेतारण कर्जाशी संबंधित प्रक्रियांवर परिणाम होण्याची शक्यता आहे. तेलंगणा राज्यस्तरीय बँकर्स समितीने ग्राहकांना आधीच खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे. रोख रकमेची गरज असल्यास एटीएमचा वापर करावा, तसेच इंटरनेट बँकिंग, यूपीआय आणि इतर डिजिटल बँकिंग माध्यमांचा वापर करण्याचा सल्ला देण्यात आला आहे.संपाच्या काळात काही शाखा आणि कार्यालयांमध्ये मर्यादित स्वरूपात सेवा सुरू ठेवण्याचा प्रयत्न केला जाणार असला, तरी नियमित कामकाज पूर्ण क्षमतेने सुरू राहण्याची खात्री नाही. त्यामुळे शाखेत प्रत्यक्ष जाऊन करावयाचे व्यवहार आजच पूर्ण करणे ग्राहकांसाठी महत्त्वाचे ठरणार आहे. विशेषतः ग्रामीण भागातील ग्राहक, ज्येष्ठ नागरिक आणि रोख व्यवहारांवर अवलंबून असलेल्या नागरिकांना या व्यत्ययाचा अधिक फटका बसू शकतो.

डिजिटल व्यवहार उपलब्ध असले तरी प्रत्येक बँकिंग सेवा ऑनलाइन माध्यमातून पूर्ण करता येत नाही. बँकिंग व्यवस्था डिजिटल झाली असली, तरी शाखा सेवा अजूनही अत्यावश्यक आहेत. त्यामुळे आजच्या संपाच्या पार्श्वभूमीवर ग्राहकांनी पुढील चार दिवसांचा आर्थिक व्यवहारांचा विचार करून नियोजन करणे गरजेचे आहे.

# मुलांच्या भवितव्याची चिंता सर्वोच्च न्यायालयाला; केंद्र सरकार मात्र अजूनही डिजिटल धोक्यांपासून दूर?

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

अल्पवयीन मुलांच्या सोशल मीडिया आणि डिजिटल प्लॅटफॉर्मवरील वाढत्या वापराबाबत सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केलेली चिंता केवळ एका जनहित याचिकेपुरती मर्यादित नाही. ती देशाच्या भावी पिढीच्या सुरक्षिततेशी संबंधित गंभीर बाब आहे. मुलांच्या मानसिक, शारीरिक आणि सामाजिक आरोग्यावर डिजिटल जगाचा परिणाम होत असताना न्यायालयाला 'फायरवॉल'ची गरज जाणवते, मग केंद्र सरकारला ही गरज अद्याप का जाणवत नाही? हा प्रश्न आता उपस्थित होतो.

'जस्ट राइट्स फॉर चिल्ड्रन अलायन्स'च्या याचिकेवर सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठाने केंद्र सरकारला नोटीस बजावली. सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची यांनी, काही फायरवॉल असायला हवेत, असे तोंडी निरीक्षण नोंदवले. हे निरीक्षण डिजिटल युगातील बालसुरक्षेची गंभीरता अधोरेखित करणारे आहे.

ऑनलाइन जगात मुलांना केवळ मनोरंजन किंवा माहिती मिळत नाही;





त्याचबरोबर ऑनलाइन ग्रूमिंग, लैंगिक शोषण, सेक्सटॉर्शन, डिजिटल तस्करी आणि वयाला अनुचित आशयासारखे धोकेही आहेत. अशा परिस्थितीत सोशल मीडिया खाते उघडताना वापरकर्त्याचे वय प्रभावीपणे तपासले जाते का, हा मूलभूत प्रश्न आहे.

मुलाचे वय १८ वर्षांपेक्षा कमी आहे म्हणून त्याची डिजिटल सुरक्षितता आपोआप सुनिश्चित होत नाही. उलट, तंत्रज्ञानाचा वेग आणि त्याची समज यांच्यातील अंतर वाढत असल्याने नियमन अधिक प्रभावी असणे आवश्यक आहे.

याचिकेत भारतीय करार कायद्याच्या कलम ११चा संदर्भ देत अल्पवयीन व्यक्तीला करार करण्याची कायदेशीर क्षमता नसल्याचा मुद्दा मांडण्यात आला आहे. त्यामुळे सोशल मीडिया प्लॅटफॉर्मशी संबंधित अटी स्वीकारताना अल्पवयीनांच्या कायदेशीर स्थितीचाही विचार व्हायला हवा, असा युक्तिवाद करण्यात आला आहे.

येथे प्रश्न सोशल मीडिया बंद करण्याचा नाही. प्रश्न आहेमुलांना डिजिटल स्वातंत्र्य देताना त्यांची सुरक्षा कोण सुनिश्चित करणार? पालकांवर संपूर्ण जबाबदारी ढकलून सरकार आणि प्लॅटफॉर्मची जबाबदारी संपते का?

मुलांच्या भवितव्यावर परिणाम करणाऱ्या या प्रश्नावर सर्वोच्च न्यायालयाने सक्रियपणे चिंता व्यक्त केली आहे. त्यामुळे केंद्र सरकारने केवळ नोटिशीला उत्तर देण्यापलीकडे जाऊन ठोस धोरण, प्रभावी वय-पडताळणी आणि बालसुरक्षा यंत्रणा उभारण्याची गरज आहे.

न्यायालयाला मुलांचे भविष्य धोक्यात दिसते; केंद्र सरकारला ते दिसण्यासाठी आणखी किती इशारे लागणार?

## शिक्षणासाठी निधीची चणचण, कुंभमेळ्यासाठी १,८०० कोटींची उधळण? फडणवीस सरकारच्या 'प्राधान्यां'वर सवाल

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
**मुंबई : प्रतिनिधी**

शिक्षणासाठी निधी कमी पडत असल्याचे सांगणारे राज्य सरकार नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी तब्बल १,८०० कोटी रुपयांना मंजुरी देते, तेव्हा सरकारच्या विकासाच्या प्राधान्यक्रमावर प्रश्नचिन्ह उपस्थित होणे स्वाभाविक आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी, शाळांच्या पायाभूत सुविधांसाठी आणि शिक्षकांच्या प्रश्नांसाठी निधीची कमतरता भासते; मात्र धार्मिक मेळाव्याच्या तयारीसाठी हजारो कोटींच्या तरतुदी सहज उपलब्ध होतात, हा विरोधाभास जनतेच्या नजरेतून कसा सुटणार?विशेष म्हणजे, कुंभमेळ्याच्या नावाने बनावट कामांच्या आदेशांशी संबंधित ३०५ कोटी रुपयांच्या कथित घोटाळ्याचा तपास नुकताच समोर आला आहे. अशा पार्श्वभूमीवर आणखी १,८०० कोटींचा निधी मंजूर करताना पारदर्शकता, नियंत्रण आणि उत्तरदायित्वाची यंत्रणा किती कडक असेल, हा प्रश्न महत्त्वाचा आहे.

सरकारने निधी केवळ मंजूर कामांसाठी वापरण्याच्या, प्रशासकीय व तांत्रिक मंजुरीनंतरच खर्च करण्याच्या आणि विनियोग प्रमाणपत्र सादर करण्याच्या अटी घातल्या आहेत. पण प्रश्न केवळ नियमांचा नाही; त्या नियमांची प्रत्यक्ष अंमलबजावणी कोण करणार आणि गैरव्यवहार झाल्यास जबाबदार कोणाला धरणार? भाजपच्या हिंदुत्ववादी राजकारणात धार्मिक आयोजनांना विशेष राजकीय महत्त्व दिले जाते, अशी टीका विरोधकांकडून सातत्याने होते. त्यामुळे शिक्षण, आरोग्य आणि रोजगारापेक्षा कुंभमेळ्याला आर्थिक प्राधान्य का? हा सवाल आता अधिक तीव्र झाला आहे.

धर्म आणि श्रद्धेला विरोध करण्याचा प्रश्न नाही. प्रश्न आहे तो करदात्यांच्या पैशांच्या प्राधान्यक्रमाचा. विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी सरकारकडे पैसा अपुरा आणि धार्मिक सोहळ्यासाठी कोट्यवधींची तरतूद मुबलकहा कारभार 'विकास' म्हणायचा की राजकीय-वैचारिक प्राधान्यांचा नमुना?

## कुंभमेळ्याच्या सीसीटीव्हीसाठी ३०० कोटी, शेतकऱ्यांसाठी मदत कुठे? सपकाळांचा सरकारला सवाल

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

महाराष्ट्रातील शेतकरी पावसाच्या दडीमुळे संकटात सापडला असताना राज्यातील महायुती सरकारचे लक्ष मात्र कुंभमेळ्याच्या तयारीकडे असल्याचा आरोप काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला. कुंभमेळ्यातील सीसीटीव्हीसाठी ३०० कोटी रुपये खर्च करण्याची तयारी असलेल्या सरकारकडे संकटग्रस्त शेतकऱ्यांसाठी निधी नाही का? असा सवाल त्यांनी केला.

नवी दिल्लीतील नवीन महाराष्ट्र सदन येथे प्रसारमाध्यमांशी बोलताना सपकाळ म्हणाले की, महाराष्ट्राचा प्रमुख खरीप हंगाम पावसावर अवलंबून आहे. पेरण्या उशिरा झाल्यानंतर गेल्या महिनाभरापासून पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. जे पेरले ते उगवले नाही आणि जे उगवले ते करपून गेले, अशी बिकट परिस्थिती अनेक भागांत निर्माण झाली आहे.

पावसाने खंड दिल्यानंतर सरकारने कृत्रिम पावसासारख्या पर्यायांवर तातडीने विचार करणे अपेक्षित होते. मात्र, त्याकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोप सपकाळ यांनी केला. वीजपुरवठा खंडित होत असल्याने उपलब्ध पाण्याचा वापर करून पिके वाचवणेही शेतकऱ्यांना कठीण होत असल्याचे त्यांनी सांगितले. सरकारने तातडीने राज्यात दुष्काळ जाहीर करून हेक्टरी ५० हजार रुपये मदत द्यावी, तसेच केंद्राच्या निकषांनुसार शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी त्यांनी केली. जनावरांसाठी चारा, पिण्याचे पाणी आणि संभाव्य टंचाईचे नियोजन आतापासूनच करावे. कुंभमेळ्यासाठी कोट्यवधींची तरतूद शक्य असेल, तर अन्नदात्याला मदत देताना हात आखडता का? हा प्रश्न सरकारने स्पष्ट करावा, असे सपकाळ म्हणाले.

## वकील म्हणून कायद्यापेक्षा वरचढ होता येणार नाही; चौकशीपासून विशेष संरक्षण नाही

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
**जम्मू-काश्मीर : वृत्तसंस्था**

केवळ व्यक्ती वकील आहे म्हणून तिला पोलिसांच्या कायदेशीर चौकशीपासून विशेष संरक्षण मिळू शकत नाही. वकील असणे म्हणजे कायद्यापेक्षा वरचे स्थान मिळणे नव्हे, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण जम्मू-काश्मीर आणि लडाख उच्च न्यायालयाने नोंदवले आहे.

अधिवक्ता वसीम अहमद रेशी यांच्या याचिकेवर न्यायमूर्ती संजय परिहार यांनी सुनावणी केली. संबंधित एफआयआरच्या तपासाच्या संदर्भात पोलिसांकडून धमकावले जात असून त्रास दिला जात असल्याचा दावा याचिकाकर्त्याने केला होता.

मात्र, न्यायालयाने स्पष्ट केले की, वकील असल्यामुळे पोलिसांच्या कायदेशीर तपासातून प्रतिरक्षा मिळत नाही. वकील हा न्यायालयाचा अधिकारी असल्याने त्याच्याकडून कायद्याचे पालन आणि तपास यंत्रणेला आवश्यक ते कायदेशीर सहकार्य करण्याची अपेक्षा असते.

तपासाचा उद्देश सत्य शोधणे हा असल्याने कायदेशीर पद्धतीने माहिती किंवा सहकार्य मागितले जात असल्यास त्याला प्रतिसाद देणे आवश्यक आहे. पोलिसांकडून होणारी प्रत्येक चौकशी ही धमकी किंवा छळ मानता येणार नाही, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

त्याचवेळी तपास यंत्रणेलाही कायदेशीर मर्यादा आणि निर्धारित प्रक्रियेचे पालन करणे बंधनकारक आहे. वकील असो वा सामान्य नागरिककायद्यापुढे सर्व समान, हा या निर्णयाचा मूलभूत संदेश आहे.

न्यायालयाने वकिलांच्या व्यावसायिक भूमिकेसोबतच कायद्याप्रती असलेल्या जबाबदारीवर भर देत याचिका निकाली काढली.

## एका इमारतीच्या दुर्घटनेने देशभरातील बांधकाम व्यवस्थेला आरसा; मंजुरी देणाऱ्या यंत्रणांवर सर्वोच्च न्यायालयाची नजर

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दिल्लीतील सत्य निकेतन येथील पीजी इमारत कोसळण्याच्या एका दुर्घटनेने देशभरातील बांधकाम व्यवस्थेतील संभाव्य त्रुटींचा गंभीर प्रश्न सर्वोच्च न्यायालयासमोर आणला आहे. एखादी इमारत कोसळते तेव्हा दोष केवळ बांधकाम करणाऱ्याचा असतो का, की नकाशे मंजूर करणाऱ्या, परवानग्या देणाऱ्या आणि नियमांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी असलेल्या सरकारी यंत्रणांचीही जबाबदारी तपासली पाहिजे? हा मूलभूत प्रश्न आता उपस्थित झाला आहे.

न्यायमूर्ती अहसानुद्दीन अमानुल्लाह आणि न्यायमूर्ती आर. महादेवन यांच्या खंडपीठाने हा प्रश्न केवळ दिल्लीपुरता किंवा पीजी इमारतींपुरता मर्यादित न ठेवता देशव्यापी पातळीवर नेला आहे. राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या राजधानीतील स्थानिक स्वराज्य संस्था व नागरी प्रशासनाकडून बांधकाम नियमभंग आणि जमिनीच्या गैरवापराबाबत अहवाल मागवण्यात आले आहेत.

पीजीपुरता प्रश्न मर्यादित नसून जिम, कोचिंग सेंटर, बीपीओ आणि इतर व्यावसायिक आस्थापनांमध्येही बांधकाम व वापराच्या नियमांचे उल्लंघन होऊ शकते, याकडे न्यायालयाचे लक्ष वेधण्यात आले.

यातून सरकारी मंजुरी यंत्रणांच्या कार्यक्षमतेवरही प्रश्नचिन्ह उभे राहते. नियम असतील, तर त्यांची तपासणी कोण करतो? बांधकामाला परवानगी देताना सुरक्षा निकष तपासले जातात का? अनधिकृत बांधकामांकडे अधिकारी डोळेझाक करतात का? दुर्घटना घडल्यानंतर कारवाई करण्यापेक्षा दुर्घटनेपूर्वी प्रतिबंध करण्याची जबाबदारी कोणाची?

सत्य निकेतन दुर्घटनेनंतर दिल्ली उच्च न्यायालयातील देखरेखीची कार्यवाही सुरू ठेवण्यास सर्वोच्च न्यायालयाने परवानगी दिली आहे. मात्र, त्याचवेळी देशभरातील बांधकाम आणि जमीनवापराच्या नियमभंगाचा व्यापक आढावा घेण्याचे निर्देश देऊन न्यायालयाने स्पष्ट संदेश दिला आहे.

एक इमारत कोसळली; पण तिच्या ढिगाऱ्याखाली केवळ भिंती नाहीत, तर सरकारी मंजुरी आणि देखरेख व्यवस्थेची विश्वासार्हताही दबली आहे का? आता देशभरातून मागवण्यात येणारे अहवाल या प्रश्नाचे उत्तर देणार आहेत.

# विद्यार्थी आंदोलनाच्या चौकशीवरच संशयाची सावली

## सर्वोच्च न्यायालयाचा विश्वास पुरेसा, पण समाजाचा संशय कोण दूर करणार?

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

विद्यार्थी आंदोलनातील हिंसाचाराची चौकशी करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने स्थापन केलेल्या उच्चस्तरीय चौकशी समितीच्या (वझएउ) निष्पक्षतेवर प्रश्न उपस्थित होत असताना, हा वाद केवळ एका माजी पोलिस अधिकाऱ्याच्या सदस्यत्वापुरता मर्यादित राहिलेला नाही. न्यायालयाने समिती स्थापन केली म्हणून तिच्यावर संशय घेऊ नये, हे न्यायालयाचे म्हणणे रास्त असले तरी समाजाच्या मनातील संशय दूर करण्याची जबाबदारीही तितकीच महत्त्वाची आहे.

सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. याचिकाकर्त्यांनी समितीतील माजी डीजीपीच्या सदस्यत्वावर आक्षेप घेत त्यांच्या स्वतंत्रतेबाबत प्रश्न उपस्थित केला.

सर्वोच्च न्यायालयाने मात्र समितीची तातडीने पुनर्रचना करण्याबाबत अनुत्सुकता व्यक्त केली. न्यायालयाने स्वतः स्थापन केलेली समिती पक्षपाती आहे, असे केवळ पूर्वग्रहाच्या आधारावर गृहित धरता येणार नाही, अशी भूमिका न्यायालयाने घेतली. ही भूमिका संस्थात्मक विश्वासाच्या दृष्टीने महत्त्वाची आहे.

मात्र, येथे आणखी एक मूलभूत प्रश्न उभा राहतोन्यायालयाचा समितीवरील विश्वास आणि सामान्य नागरिकांचा समितीवरील विश्वास हे एकच असतात का?

विद्यार्थी आंदोलनातील हिंसाचाराच्या चौकशीचा विषय संवेदनशील आहे. आंदोलनकर्ते, पोलिस आणि प्रशासन या तिन्ही बाजूंच्या भूमिकेची निष्पक्ष तपासणी होणे अपेक्षित आहे. अशा वेळी चौकशी करणाऱ्या व्यक्तीच्या पूर्वीच्या पदामुळे किंवा भूमिकेमुळे प्रश्न उपस्थित होत



असतील, तर त्या शंकांचे निरसन करणेही चौकशी प्रक्रियेचाच भाग ठरायला हवे.

न्यायालयाने मात्र एक महत्त्वाची खिडकी खुली ठेवली आहे. संपूर्ण समितीवर अविश्वास दाखवण्याऐवजी माजी डीजीपीच्या सदस्यत्वाबाबत मांडण्यात आलेले ठोस आणि विशिष्ट आक्षेप स्वतंत्रपणे तपासले जातील, असे खंडपीठाने स्पष्ट केले.

याचा अर्थ न्यायालयाने आक्षेप पूर्णपणे फेटाळलेले नाहीत. उलट, व्यक्तीच्या पूर्वीच्या पदापेक्षा तिच्याविरुद्ध असलेले ठोस हितसंबंधांचे संघर्ष, पूर्वीची भूमिका किंवा प्रत्यक्ष पक्षपात दर्शवणारे घटक महत्त्वाचे ठरतील, असा न्यायालयीन दृष्टिकोन यात दिसतो.

न्यायालयीन समिती म्हणजे विश्वासाची हमी; पण पारदर्शकता ही त्या विश्वासाची परीक्षा असते. विद्यार्थी आंदोलनातील हिंसाचाराच्या चौकशीमध्ये कोण दोषी आणि कोण निर्दोष हे राजकीय सोयीने नव्हे, तर पुराव्यांच्या आधारे ठरले पाहिजे.

सरकारविरोधी आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांबाबत चौकशी होत असेल, तर चौकशीवर किंचितही पक्षपाताची सावली राहू नये, ही लोकशाहीची गरज आहे. त्याच वेळी केवळ एखाद्या सदस्याची पार्श्वभूमी पाहून संपूर्ण समितीला पक्षपाती ठरवणेही योग्य ठरणार नाही.

म्हणून पुढील सुनावणी निर्णायक ठरू शकते. न्यायालयाने समितीवर विश्वास ठेवला आहे; आता त्या समितीने आपल्या कामातून समाजाचा विश्वास संपादन करणे आवश्यक आहे

## संपादकीय

### भ्रष्टाचाराची वाळवी आणि प्रशासनाचा कणा

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या बांधकाम परवाना विभागातील दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कथित भ्रष्टाचाराची उच्चस्तरीय चौकशी करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. हा निर्णय स्वागतार्ह असला तरी त्यातून महापालिका प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहते. कारण हा विषय केवळ दोन अधिकाऱ्यांपुरता मर्यादित नसून, बांधकाम परवानग्यांच्या प्रक्रियेत पारदर्शकता आणि उत्तरदायित्व किती आहे, याची कसोटी आहे.

तक्रारींमध्ये प्रति चौरस फुटामागे ५ ते ६ रुपयांची कथित मागणी, तांत्रिक त्रुटींचे कारण पुढे करून फाईल्स महिनोन्महिने प्रलंबित ठेवणे आणि विकास प्रकल्पांशी संबंधित नकाशे, रस्ते किंवा आरक्षणांच्या मुद्द्यांचा कथित आर्थिक दबावासाठी वापर केल्याचे आरोप आहेत. हे आरोप चौकशीत सिद्ध होणे आवश्यक आहे; मात्र ते खरे ठरले तर ही बाब एखाद्या व्यक्तीच्या गैरवर्तनापेक्षा गंभीर ठरेल. फाईलची गती आणि आर्थिक व्यवहार यांच्यात संबंध निर्माण झाला असेल, तर त्यामागे संपूर्ण यंत्रणेतील कोणत्या त्रुटी कारणीभूत आहेत, याचा शोध घ्यावा लागेल.

बांधकाम परवाना विभाग हा शहराच्या विकासाचा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. एका फाईलला अनावश्यक विलंब झाला तर त्याचा परिणाम कोट्यवधींच्या गुंतवणुकीवर, रोजगारावर आणि शहराच्या नियोजनावर होतो. त्यामुळे प्रशासनातील विलंब हा केवळ कार्यालयीन त्रुटी न राहता आर्थिक परिणाम घडवणारा घटक ठरू शकतो. अशा परिस्थितीत नागरिक आणि बांधकाम व्यावसायिकांचा प्रशासनावरील विश्वास टिकवणे ही पालिकेची प्राथमिक जबाबदारी आहे.

एकाच महत्त्वाच्या पदावर अधिकारी दीर्घकाळ राहिल्यास हितसंबंधांचे जाळे निर्माण होण्याची शक्यता वाढते. त्यामुळे चौकशी निष्पक्ष व्हावी यासाठी संबंधित अधिकाऱ्यांच्या पदाबाबत प्रशासनाने योग्य निर्णय घेणे आवश्यक आहे. चौकशीदरम्यान फाईल्स, डिजिटल नोंदी किंवा इतर पुराव्यांवर कोणताही प्रभाव पडणार नाही, याची दक्षता घेतली पाहिजे. तसेच आरोपांमध्ये तथ्य आढळल्यास संबंधितांच्या ज्ञात-अज्ञात मालमत्ता आणि आर्थिक व्यवहारांची सक्षम तपास यंत्रणेमार्फत चौकशी करण्याचा मार्गही खुला ठेवला पाहिजे.

मुख्यमंत्र्यांनी चौकशीचे आदेश देणे ही सुरुवात आहे, शेवट नाही. अशा प्रकरणांत समिती नेमली जाते, काही दिवस चर्चा होते आणि नंतर अहवालाच्या प्रतीक्षेत प्रकरण थंडावते, असा अनुभव पुन्हा येता कामा नये. चौकशी कालबद्ध, स्वतंत्र आणि निष्पक्ष असली पाहिजे. दोष सिद्ध झाल्यास कारवाई झालीच पाहिजे आणि आरोप निराधार ठरल्यास संबंधित अधिकाऱ्यांवरील संशयही स्पष्टपणे दूर झाला पाहिजे.

मात्र कारवाई केवळ व्यक्तींवर थांबवून उपयोग नाही. बांधकाम परवानगीची प्रक्रिया अधिकाधिक ऑनलाइन, पारदर्शक आणि मानवी हस्तक्षेपमुक्त करणे आवश्यक आहे. प्रत्येक फाईल कोणत्या टप्प्यावर आहे, किती दिवस प्रलंबित आहे आणि निर्णयासाठी कोण जबाबदार आहे, याची डिजिटल नोंद उपलब्ध झाली तर 'फाईल अडवून ठेवण्याची' शक्यता मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते. प्रशासनाने तंत्रज्ञानाचा वापर केवळ कागदोपत्री डिजिटलायझेशनसाठी न करता उत्तरदायित्व निश्चित करण्यासाठी करायला हवा.

पिंपरी-चिंचवड हे राज्यातील प्रमुख औद्योगिक आणि आर्थिक केंद्र आहे. अशा शहराच्या विकासाची चावी जर संशयास्पद व्यवहारांच्या सावलीत अडकली, तर नुकसान केवळ पालिकेच्या प्रतिमेचे होणार नाही; तर गुंतवणूकदार, व्यावसायिक आणि सामान्य करदात्यांचा व्यवस्थेवरील विश्वासही डळमळेल. म्हणूनच मुख्यमंत्र्यांच्या आदेशानंतर आता पालिका प्रशासनाची खरी परीक्षा आहे. भ्रष्टाचाराची वाळवी केवळ दोन अधिकाऱ्यांवर कारवाई करून थांबणार नाही; तिला पोसणारी व्यवस्था बदलावी लागेल. चौकशीचा अहवाल, त्यावरील कारवाई आणि त्यानंतर होणाऱ्या प्रशासकीय सुधारणांतूनच पिंपरी-चिंचवडच्या प्रशासनाचा कणा खरोखर मजबूत आहे की तो कागदोपत्रीच उभा आहे, हे स्पष्ट होईल.

# मालमत्ता कर वसुलीला गती; थकबाकीदारांवर १ ऑक्टोबरपासून जप्तीची कारवाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी

पिंपरी-चिंचवड महापालिकेने आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी मालमत्ता कर वसुलीचे १३०० कोटी रुपयांचे उद्दिष्ट निश्चित केले असून, आतापर्यंत ५८४ कोटी ४९ लाख ४५ हजार २२८ रुपयांचा करभरणा झाला आहे. उद्दिष्टपूर्तीसाठी थकबाकीदारांवर नियोजनबद्ध कारवाई करण्याचे निर्देश अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी दिले.



महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाच्या आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. बिगरनिवासी आणि औद्योगिक मालमत्तांच्या थकबाकी वसुलीला प्राधान्य देऊन स्वतंत्र वसुली पथके तयार करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. तसेच मिश्र मालमत्ता, मोकळ्या जागा आणि अन्य थकबाकीदार मालमत्तांची स्वतंत्र यादी तयार करण्याचे निर्देश देण्यात आले.

ज्या मालमत्ताधारकांना बिले बजावण्यात आली आहेत, मात्र अद्याप कर भरलेला नाही, अशा मालमत्ताधारकांशी संपर्क साधून कर भरण्याबाबत मार्गदर्शन करावे, तसेच थकबाकी वसुलीसाठी आवश्यक कार्यवाही करावी, असे सांडभोर यांनी सांगितले.

३० सप्टेंबरपूर्वी नोटिसा, १ ऑक्टोबरपासून जप्ती

थकबाकीदार मालमत्ताधारकांना ३० सप्टेंबरपूर्वी नोटिसा बजावून, १ ऑक्टोबरपासून जप्तीची कारवाई सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयाने आपल्या कार्यक्षेत्रातील थकबाकीचे सूक्ष्म नियोजन करून कोणत्या प्रकारच्या मालमत्तांकडे किती थकबाकी आहे, कोणाला बिले देण्यात आली आहेत आणि कोणाकडून अद्याप भरणा झालेला नाही, याची अद्ययावत माहिती ठेवावी, असेही स्पष्ट करण्यात आले.

दरम्यान, ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत ऑनलाइन मालमत्ता कर भरल्यास सामान्य करावर ४ टक्के सवलत दिली जात आहे. या सवलतीचा लाभ घेण्यासाठी आता शेवटचे २० दिवस शिल्लक असल्याने नागरिकांनी अंतिम मुदतीची वाट न पाहता कराचा भरणा करावा, असे आवाहन अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी केले.

बैठकीस उपायुक्त सचिन पवार, कर आकारणी व कर संकलन विभागाचे अधिकारी, मुख्य कार्यालयातील अधिकारी तसेच सर्व १८ क्षेत्रीय कार्यालयांतील मंडल अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# अहिल्यादेवी होळकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त पिंपरी-चिंचवडमध्ये अभिवादन

## शर्मिला बाबर : लोककल्याण आणि सामाजिक उत्तरदायित्वाचा आदर्श प्रेरणादायी

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी प्रजेच्या कल्याणाला केंद्रस्थानी ठेवून न्याय, प्रशासन आणि सामाजिक सुधारणांना प्राधान्य दिले. सर्वसामान्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यावर उपाययोजना करण्याची त्यांची कार्यपद्धती आजही आदर्श आहे. महिला नेतृत्व, लोककल्याण आणि सामाजिक उत्तरदायित्वाचा त्यांनी घालून दिलेला आदर्श आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी आहे,

असे प्रतिपादन उपमहापौर शर्मिला बाबर यांनी केले.

अहिल्यादेवी होळकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनातील त्यांच्या प्रतिमेस तसेच मोरवाडी येथील स्मारकास



शर्मिला बाबर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यावेळी त्या बोलत होत्या.

यावेळी विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, माजी नगरसदस्य राजू दुर्गे, उपआयुक्त अण्णा बोदडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, सामाजिक कार्यकर्ते सदाशिव पडळकर, लक्ष्मण रुपनर, मुकुंद कुचेकर, दीपक भोजने, राहुल मदने, सोनाताई गडदे, भुजंग दुधाळे, माणिकराव बारगळ, शंकर दातीर, गणेश एकल, जयंत वायकुळे, रवींद्र कंकरे, सतीश खरात, वंदना धनगर आदी उपस्थित होते.

सांगवी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांच्या पुतळ्यास विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी 'ह' प्रभाग अध्यक्षा तृप्ती कांबळे, प्रभाग अधिकारी संतोष कोराड, अहिल्यादेवी सेवा संघाचे अध्यक्ष सचिन सरक, सामाजिक कार्यकर्ते सूर्यकांत गोफणे, अभिमन्यू गाडेकर, अजय दूधभाते, नवनाथ बीडे, छगन वाघमोडे, कृष्णराव गिरगुणे, संदिपान सामसे, रमेश गाढवे, गिरीश देवकाते, ज्ञानेश्वर मडबळ, प्रा. गलांडे, बळीराम घोडके, महेंद्र लंबाते, नारायण भुरे, वाघमारे सर, अक्षय तिघाडे, भास्कर गाडेकर, अरविंद टेकाळे, हरिश्चंद्र गायके आदी उपस्थित होते.

अहिल्यादेवी होळकर यांचे जीवन कर्तव्यनिष्ठा, न्यायप्रियता आणि लोकसेवेचे उत्तम उदाहरण आहे. राज्यकारभार करताना त्यांनी प्रजेच्या सुख-दुःखाला महत्त्व देत समाजातील विविध घटकांच्या हिताचा विचार केला. विकासाची दूरदृष्टी आणि लोककल्याणाची भूमिका यामुळे त्यांचे कार्य आजच्या आणि भावी पिढ्यांसाठीही मार्गदर्शक आहे, असे भाऊसाहेब भोईर यांनी सांगितले.

# महागाईमुळे देशभरातील गणेशोत्सवाची आर्थिक उलाढाल १ लाख कोटींच्या पुढे

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी

गणेशोत्सव अवघ्या पाच दिवसांवर येऊन ठेपला असल्याने बाजारपेठेमध्ये खरेदीसाठी उत्साहाचे वातावरण आहे. वाढत्या महागाईमुळे देशाच्या अर्थचक्राला चालना देणाऱ्या गणेशोत्सवाची आर्थिक उलाढाल यंदा एक लाख कोटी रुपयांच्या पुढे जाण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. २०१५ मध्ये सुमारे २० हजार कोटी असलेली देशभरातील गणेशोत्सवाची आर्थिक उलाढाल ही अवघ्या अकरा वर्षांत ५.७५ पट वाढल्याचे दिसते. महाराष्ट्रात मुख्यत्वे पुणे आणि मुंबई ही बाजारपेठेची मुख्य केंद्रे मानली जातात. यंदा पुणे जिल्ह्यात गणेशोत्सवाच्या काळात तब्बल १० हजार कोटी रुपयांची आर्थिक उलाढाल होण्याची शक्यता रिटेल महासंघाने वर्तविली आहे.

यंदाचा गणेशोत्सव महिन्याच्या मध्यावर आल्याने नोकरदार वर्गाकडे पैसा उपलब्ध असून, बाजारपेठेत सकारात्मक वातावरण आहे. गणेशोत्सवाबाबत व्यापारी वर्गात मोठा उत्साह दिसून येत आहे. पुण्यात नोंदणीकृत व्यापारी सुमारे अडीच ते तीन लाख असले, तरी घरगुती व्यवसाय करणाऱ्या महिला, मूर्तिकार, मंडप व्यावसायिक, मिठाई, विद्युत रोषणाई अशा तब्बल १५० हून अधिक विविध क्षेत्रांतील सुमारे ७ ते ८ लाख छोट्या-मोठ्या व्यावसायिकांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार मिळत आहे.

त्यामुळे गणेशोत्सव हा रोजगारनिर्मितीचा महत्त्वाचा उत्सव मानला जातो. सध्या महागाईमुळे कच्चा माल, वाहतूक आणि मजुरी वाढली असली, तरी सणाचा उत्साह पाहता नागरिक खरेदीसाठी बाहेर पडत आहेत.

# विद्यार्थ्यांनी दिला पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा धडा; मानवी साखळीतून नागरिकांमध्ये जनजागृती

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी

पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या 'इ' क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतील प्रभाग क्रमांक ५ येथील एसपीजी इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, आळंदी रोड, भोसरीच्या विद्यार्थ्यांनी अभिनव उपक्रम राबविला. विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक गणेश प्रतिमा तयार करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. तसेच मानवी साखळीच्या माध्यमातून नागरिकांमध्ये जनजागृती केली.

महापौर रवि लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम आणि उपआयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांच्या मार्गदर्शनाखाली 'माझी वसुंधरा ७.०' आणि स्वच्छ सर्वेक्षण २०२६ अभियानांतर्गत पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी विविध



जनजागृती उपक्रम राबविले जात आहेत.

प्लास्टिक टाळण्याचे आवाहन

मानवी साखळीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी गणेशोत्सवात प्लास्टिकचा वापर टाळावा, नैसर्गिक व पर्यावरणपूरक सजावटीला प्राधान्य द्यावे आणि परिसर स्वच्छ ठेवावा, असा संदेश दिला. यावेळी 'हरित शिक्षक शपथ' घेण्यात आली. स्वच्छतेच्या घोषणांमधून पर्यावरण संवर्धनाबाबत नागरिकांचे लक्ष वेधण्यात आले.


गणेशोत्सवाची भक्ती आणि उत्साह कायम ठेवतानाच पर्यावरणाचे संरक्षण करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणपूरक गणेशोत्सवाची जाणीव निर्माण झाल्यास हा संदेश त्यांच्या कुटुंबातून समाजापर्यंत पोहोचतो. त्यामुळे पर्यावरण संवर्धनासाठी विद्यार्थी आणि नागरिकांनी पुढाकार घ्यावा, असे उपआयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी सांगितले.

# तडीपार गुंडाची कारच्या टपावर बसून दहशत! समाजमाध्यमावरील व्हिडिओची पोलिसांकडून दखल, सोन्या कांबळेविरुद्ध गुन्हा

■ दैनिक राज्य लोकतंत्र
बारामती : प्रतिनिधी

तडीपारीचा आदेश असतानाही बारामती शहरात प्रवेश करून फॉर्च्युनर वाहनातून नागरिकांमध्ये दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी अक्षय उर्फ सोन्या भिमराव कांबळे याच्याविरुद्ध बारामती शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. समाजमाध्यमावर प्रसारित झालेल्या चित्रफितीची पोलिसांनी स्वतःहून दखल घेत ही कारवाई केली.

८ सप्टेंबर रोजी समाजमाध्यमावर प्रसारित झालेल्या चित्रफितीत एमएच-४२-बीएन-९७८६ क्रमांकाच्या फॉर्च्युनर वाहनाच्या टपावर तसेच बाहेरील भागावर काही जण बसलेले दिसून आले. यातील काही जण नागरिकांकडे हातवारे करीत असल्याचेही चित्रफितीत दिसत होते. पोलिसांनी चित्रफितीची पडताळणी केली असता त्यामध्ये अक्षय उर्फ सोन्या कांबळे असल्याचे प्रथमदर्शनी निष्पन्न झाले. कांबळे याला १८ जानेवारी २०२५ ते १७ जानेवारी २०२७ या कालावधीसाठी पुणे जिल्हा, पुणे शहर, पिंपरी-चिंचवड तसेच फलटण तालुक्यातून तडीपार करण्यात आले आहे. तडीपारीचा



आदेश लागू असतानाही बारामती शहरात प्रवेश केल्याचे समोर आल्याने त्याच्याविरुद्ध पोलिसांनी कारवाई केली आहे.

पोलिस शिपाई गिरीश नेवसे यांच्या फिर्यादीवरून बारामती शहर पोलिस ठाणे, बारामती येथे गुन्हा क्रमांक ३७२/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम २८१, २८५ तसेच मोटार वाहन कायद्यातील संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तडीपारीच्या आदेशाचे उल्लंघन केल्याबाबत स्वतंत्र कारवाईही सुरू आहे. कांबळेविरुद्ध यापूर्वीही खुनाचा प्रयत्न, मारहाण व दहशत निर्माण करण्यासह गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. दरम्यान, धीरज पडकर, अमोल कांबळे, तुषार उर्फ चिंट्या सोनवणे, अक्षय उर्फ सोन्या कांबळे, वैभव बगाडे, अक्षय सोनवणे व निलेश उमरदंड या तडीपार व्यक्तींच्या हालचालींवरही पोलिसांनी लक्ष ठेवण्यास सुरुवात केली आहे.

ही कारवाई प्रभारी पोलिस निरीक्षक श्रीशैल चिवडशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली तपास पथकाचे सहायक पोलिस निरीक्षक शशिकांत इंगवले, पोलिस हवालदार ज्ञानदेव क्षीरसागर, यशवंत पवार, उदय टापरे, रामचंद्र शिंदे, पोलिस शिपाई गिरीश नेवसे, अक्षय सीताफ व महिला पोलिस शिपाई भाग्यश्री देवकाते यांच्या पथकाने केली.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### महाळुंगे पडवळमध्ये १३० बैलांचा सहभाग; डीजेविरहित बैलपोळ्याने जपली परंपरा



■ दैनिक राज्य लोकतंत्र

मंचर । प्रतिनिधी

आंबेगाव तालुक्यात श्रावणी बैलपोळा पारंपरिक उत्साहात साजरा करण्यात आला. शेतकऱ्यांनी आपल्या लाडक्या सर्जा-राजाला सजवून विधिवत पूजा केली आणि पुरणपोळीचा घास भरविला. त्यानंतर ढोल-लेझीम व झांजपथकाच्या तालावर बैलांची वाजतगाजत मिरवणूक काढण्यात आली.

जिल्ह्यात प्रसिद्ध असलेल्या महाळुंगे पडवळ येथील बैलपोळ्यात यंदा १३० हून अधिक बैल सहभागी झाले. विशेष म्हणजे यंदाची मिरवणूक प्रथमच डीजेविरहित काढण्यात आली. पारंपरिक ढोल-लेझीम आणि झांजपथकाच्या गजरामुळे गावातील वातावरण उत्साहपूर्ण झाले. शेतकऱ्यांनी बैलांना स्वच्छ अंघोळ घालून आकर्षक झुल चढविली, शिंगांना रंग लावून फुगे बांधले. पूजेनंतर पुरणपोळीचा घास भरवून बैलांना मिरवणुकीसाठी आणण्यात आले. डॉ. नितीन अण्णासाहेब पडवळ यांच्या मानाच्या बैलाला पोलीस पाटील सविता भरत पडवळ यांच्या हस्ते सन्मानपूर्वक सोडण्यात आले. मिरवणुकीच्या अग्रभागी ढोल-लेझीम व झांजपथक होते. भंडाऱ्याची उधळण करीत सुरू झालेल्या मिरवणुकीत बळीराजा आपल्या सर्जा-राजासोबत उत्साहात सहभागी झाला. मिरवणुकीत विविध संस्थांचे पदाधिकारी, शेतकरी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले. वडगाव काशिंबेग, नारोडी, साकोरे, लांडेवाडी आदी गावांतही श्रावणी बैलपोळा उत्साहात साजरा करण्यात आला. .

# डिंभे–माणिकडोह बोगदा रद्द नाही; मुख्यमंत्र्यांकडून कार्यवाहीला स्थगिती

### मंत्रिमंडळाच्या मिनिट्सला मंजुरी मिळेपर्यंत जीआर निघणार नाही; सर्वांना विश्वासात घेऊन निर्णय घेणार : दिलीप वळसे पाटील

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मंचर । प्रतिनिधी

डिंभे–माणिकडोह बोगदा प्रकल्प रद्द झालेला नसून, त्यासंदर्भातील पुढील कार्यवाहीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्थगिती दिली आहे. मंत्रिमंडळ बैठकीतील मिनिट्सचे अप्रुव्हल होईपर्यंत या निर्णयाचा शासन निर्णय (जीआर) निघणार नाही. मुख्यमंत्री फडणवीस हा विषय मंत्रिमंडळ बैठकीत घेणार असून त्यांचा निर्णय आल्यानंतर सर्व संबंधितांना विश्वासात घेऊन पुढील निर्णय घेतला जाईल, अशी माहिती माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी मंचर येथे पत्रकार परिषदेत दिली.

डिंभे–माणिकडोह बोगद्याला स्थगिती मिळावी यासाठी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि दिलीप वळसे पाटील यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना निवेदन दिले होते. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणातील कार्यवाहीला स्थगिती दिल्याचे वळसे पाटील यांनी स्पष्ट केले.

ते म्हणाले, कुकडी प्रकल्पाच्या चतुर्थ सुधारित प्रकल्पात समावेश नसलेल्या डिंभे–माणिकडोह बोगद्याला मंत्रिमंडळाने मंजुरी दिली होती. मात्र, या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर आम्ही मुख्यमंत्र्यांकडे काही महत्त्वाच्या मागण्या केल्या आहेत. त्यामध्ये ६५ कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांसाठी २.५५ टीएमसी



पाणी राखीव ठेवणे, आदिवासी भागातील तीन योजनांसह म्हाळसाकांत योजनेसाठी राखीव पाण्याची तरतूद करणे आणि माणिकडोह धरणातील आठ बुडीत बंधाऱ्यांसाठी नव्याने निधी उपलब्ध करून देणे, या मागण्यांचा समावेश असल्याचे त्यांनी सांगितले.

फुलवडे गावाजवळ डिंभे धरणालगत बोगदा करून माणिकडोहपर्यंत पाणी नेण्याचा प्रस्ताव आहे. धरण भरल्यानंतर अतिरिक्त होणारे पाणी या बोगद्याद्वारे नेण्याचा प्रयत्न आहे. मात्र, त्याचा परिणाम घोड धरणासह शिरूर आणि श्रीगोंदा परिसरातील पाणी व्यवस्थेवर होण्याची शक्यता आहे, असा दावा वळसे पाटील यांनी केला.

बोगद्याचा जैवविविधतेवर होणारा परिणाम याचा पुरेसा अभ्यास अधिकाऱ्यांनी केलेला नाही. धरणाच्या तळाशी बोगदा झाल्यास दोन महिन्यांत धरण रिकामे होण्याची शक्यता आहे. त्यामुळे हा परिसर कायमचा दुष्काळी होण्याचा धोका आहे, असे ते म्हणाले.

डिंभे धरणाचा डावा कालवा सक्षम केल्यास बोगद्याची गरज भासणार नाही, असा पर्यायही त्यांनी मांडला. बोगदा झाल्यास जुन्नर, आंबेगाव, शिरूर, पारनेर तसेच घोड धरणावर परिणाम होऊ शकतो, असेही त्यांनी स्पष्ट केले.

माझे कोणाच्याही विरोधात भांडण नाही. माझी स्पर्धा फक्त माझ्याशीच आहे. परिसरातील शेतकरी आणि तरुण पिढीच्या भवितव्यासाठी मी प्रयत्न करत आहे. 'पाणी आमच्या मालकीचे असून ते इतरांना देणार नाही', असा चुकीचा प्रचार केला जात आहे. या विषयावर चर्चेतून मार्ग काढला पाहिजे, असे वळसे पाटील म्हणाले.

सोशल मीडियावरील विरोधकांच्या टीकेवरही त्यांनी भाष्य केले. तालुक्यातील काही लोक महत्त्वाकांक्षेने झपाटले असून ते केवळ राजकारण करत असल्याचे जनतेला माहीत आहे. आपण सोशल मीडियावरील टीका पाहत नसून आपले काम सुरूच ठेवतो, असे त्यांनी सांगितले. पाणी हा पवित्र विषय आहे. त्याला राजकारणात ओढू इच्छित नाही. जनता राजकारण करणाऱ्यांना चपराक देईल, असा इशाराही त्यांनी दिला.

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने जागतिक दर्जाचे शिक्षण केंद्र बनावे : राज्यपाल जिष्णु देव वर्मा

### विद्यापीठाचा १२७ वा दीक्षान्त समारंभ उत्साहात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे : प्रतिनिधी

कृत्रिम बुद्धिमत्ता, स्वयंचलित तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान आणि डिजिटल तंत्रज्ञानामुळे जग वेगाने बदलत आहे. या बदलत्या परिस्थितीत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने शिक्षण, संशोधन, नवोन्मेष आणि सामाजिक बांधिलकीच्या माध्यमातून जागतिक दर्जाचे शिक्षण केंद्र म्हणून पुढे यावे, असे आवाहन राज्यपाल तथा कुलपती जिष्णु देव वर्मा यांनी केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या १२७ व्या दीक्षान्त समारंभात ते बोलत होते. यावेळी कुलगुरू प्रा. सुरेश गोसावी, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पराग काळकर, कुलसचिव प्रा. डॉ. प्रफुल्ल पवार यांच्यासह व्यवस्थापन परिषदेचे सदस्य उपस्थित होते.

दीक्षान्त समारंभ हा विद्यार्थ्यांच्या जीवनातील महत्त्वाचा टप्पा असून, या टप्प्यावर ज्ञानाचे रूपांतर जबाबदारीत आणि शिक्षणाचे नेतृत्वात झाले पाहिजे. केवळ पदवी मिळविणे पुरेसे नसून विद्यार्थ्यांनी आजीवन ज्ञानार्जन करत बदलत्या काळानुसार नवी कौशल्ये आत्मसात करावीत, असे राज्यपालांनी सांगितले. शिक्षण हे केवळ रोजगाराचे साधन नसून समानता, सक्षमीकरण आणि सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे. सावित्रीबाई फुले यांचा हा विचार विद्यार्थ्यांनी पुढे न्यावा, असेही त्यांनी आवाहन केले.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२०च्या अंमलबजावणीसाठी विद्यापीठाच्या प्रयत्नांचे कौतुक करताना बहुविषयक शिक्षण, कौशल्यविकास, संशोधन, नवोन्मेष, भारतीय ज्ञानपरंपरा आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास यांना प्राधान्य देण्याचे त्यांनी सांगितले. परवडणारे आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण, डिजिटल प्रशासन तसेच हरित उपक्रमांमुळे विद्यापीठ अधिक पारदर्शक, कार्यक्षम आणि शाश्वत होईल, असे ते म्हणाले.

दुबई, सौदी अरेबिया आणि कझाकिस्तानमधील शैक्षणिक भागीदारीच्या माध्यमातून विद्यापीठाचा जागतिक विस्तार अधिक मजबूत करता येईल. विद्यार्थी देवाणघेवाण, संयुक्त संशोधन, आंतरराष्ट्रीय प्राध्यापक आणि जागतिक शैक्षणिक भागीदारीला चालना



देण्याची गरज असल्याचे राज्यपालांनी स्पष्ट केले.

उद्योग क्षेत्रासोबत भागीदारी वाढवून विद्यार्थ्यांना प्रशिक्षण, इंटर्नशिप, शिकाऊ उमेदवारी, संशोधन आणि प्रत्यक्ष अनुभवाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात. माजी विद्यार्थ्यांचे नेटवर्कही सक्षम करून त्याचा उपयोग मार्गदर्शन, शिष्यवृत्ती, रोजगार, संशोधन आणि नवोन्मेषासाठी करावा, असे त्यांनी सांगितले.

कृत्रिम बुद्धिमत्ता, हवामान बदल, आरोग्य, कृषी, सायबर सुरक्षा, शाश्वत विकास, ग्रामीण परिवर्तन आणि उदयोन्मुख तंत्रज्ञान या क्षेत्रांतील संशोधनाला चालना देण्याचे आवाहनही राज्यपालांनी केले. प्रत्येक विद्यापीठाने वार्षिक क्रीडा दिनदर्शिका तयार करून विद्यार्थ्यांना किमान एका क्रीडा किंवा शारीरिक उपक्रमात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे. क्रीडेमुळे शिस्त, संघभावना आणि नेतृत्वगुण विकसित होतात, असे त्यांनी सांगितले.

विद्यापीठ परिसर तसेच संलग्न महाविद्यालये अमली पदार्थांच्या व्यसनापासून मुक्त ठेवण्यासाठी 'नशामुक्त भारत अभियाना'अंतर्गत जनजागृती, समुपदेशन आणि सामाजिक उपक्रम राबवावेत, असे निर्देश त्यांनी दिले. विद्यापीठ आणि महाविद्यालयांनी गावे दत्तक घेऊन साक्षरता, डिजिटल शिक्षण, आरोग्य, पर्यावरण आणि कौशल्यविकासाच्या माध्यमातून स्थानिक समुदायाशी जोडले जावे, असेही त्यांनी सांगितले.

कुलगुरू प्रा. सुरेश गोसावी यांनी विद्यापीठाच्या शैक्षणिक आणि संशोधन कामगिरीचा आढावा घेतला. विद्यापीठाशी संलग्न ८५९ महाविद्यालये व परिसंस्थांमध्ये साडेसात लाखांहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत असल्याचे त्यांनी सांगितले. ज्ञाननिर्मिती प्रयोगशाळेपुरती मर्यादित न ठेवता ती समाज, गाव, शेत आणि रुग्णालयांपर्यंत पोहोचविण्यावर विद्यापीठाचा भर असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

ज्ञाननिर्मिती, संशोधन, लोकाभिमुख तंत्रज्ञान, कौशल्यविकास, डिजिटल परिवर्तन आणि आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या माध्यमातून विद्यापीठाला नवी उंची देण्याचा संकल्प कुलगुरूंनी व्यक्त केला.

कार्यक्रमाला शैक्षणिक परिषद व अधिसभेचे सदस्य, अधिष्ठाता, प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी, निमंत्रित, पालक आणि पदवीधर विद्यार्थी उपस्थित होते.

# पाणी आहे, पण वीजपुरवठ्याचा प्रश्न कायम! ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची वाढती ओरड

■ दैनिक राज्य लोकतंत्र

केडगाव (दौंड): प्रतिनिधी

सध्या सर्वत्र पाणी उपलब्ध असतानाही केवळ महावितरणच्या ढिसाळ आणि अनियमित वीजपुरवठ्यामुळे ग्रामीण भागातील शेतकरी पुरता हवालदील झाला आहे. 'पाणी आहे, पण वीजपुरवठ्याचा प्रश्न कायम' अशी विदारक स्थिती केडगाव व परिसरात निर्माण झाली असून, शेती पंपांना मिळणाऱ्या अपुऱ्या आणि अनिश्चित विजेमुळे पिके जळून जाण्याची भीती व्यक्त होत आहे.या गंभीर समस्येवर *'दैनिक तुफान क्रांती'*ने वृत्त प्रसिद्ध करून प्रशासनाचे लक्ष वेधले आहे.= मुख्य घडामोडी आणि शेतकऱ्यांच्या तक्रारी:८ तासांच्या विजेमध्येही वारंवार खंड: शासनाने शेतीपंपांसाठी किमान ८ तास वीज पुरवठा करण्याचे जाहीर केले असले, तरी प्रत्यक्षात मात्र या वेळेतही वारंवार खंड (लोडशेडिंग) पडत आहे. त्यामुळे पिकांना वेळेवर पाणी देणे अशक्य झाले आहे.रात्रीच्या वीजपुरवठ्यामुळे जिवाला धोका: महावितरणकडून अनेकदा रात्री किंवा मध्यरात्री शेतीसाठी वीज दिली जाते. ऐन थंडी-पावसात रात्रीच्या वेळी शेतात पाणी भरण्यासाठी जावे लागत असल्याने शेतकऱ्यांना साप, विंचू आणि इतर वन्य श्वापदांचा सामना करावा लागत असून त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.केडगाव सबस्टेशनचा मनमानी कारभार: केडगाव सबस्टेशन अंतर्गत येणाऱ्या परिसरात गेल्या काही महिन्यांपासून सायंकाळी ६ ते रात्री १० या महत्त्वाच्या वेळेतच वीज गायब असते. हा तांत्रिक बिघाड आहे की वीज कंपनीची मनमानी, याचे स्पष्टीकरण देण्यास अधिकारी टाळाटाळ करत असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.शहरी आणि ग्रामीण भागांत दुजाभाव: शहरांच्या तुलनेत ग्रामीण भागात विजेचे कोणतेही ठोस नियोजन नाही. 'वरिष्ठ स्तरावरून आदेश आहेत' असे मोघम उत्तर देऊन स्थानिक अधिकारी हात झटकत असल्याने शेतकऱ्यांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.=द्य विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा बट्ट्याबोळकेवळ शेतीच नव्हे, तर वीज खंडित होण्याचा मोठा फटका ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही बसत आहे. सायंकाळी अभ्यासाच्या वेळेतच वीज नसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून पालकांना पर्यायी प्रकाश व्यवस्थेसाठी नाहक खर्च करावा लागत आहे.=प शेतकऱ्यांची प्रमुख मागणी:संतप्त शेतकऱ्यांनी महावितरणकडे थेट सवाल केला आहे की, ''आम्हाला हक्काची आणि निश्चित वीज नेमकी कधी मिळणार?''शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे खालील मागण्या केल्या आहेत:शेतीपंपांच्या वीजपुरवठ्याचे अधिकृत वेळापत्रक (टाइम-टेबल) जाहीर करावे.वारंवार होणारा तांत्रिक खंड थांबवून वीज पुरवठा सुरळीत करावा. पिकांचे नुकसान होण्यापूर्वी या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढावा.या बातमीच्या संदर्भात तुम्हाला:एखाद्या विशिष्ट भागाचे सविस्तर वाचन हवे आहे का?या समस्येवर तक्रार अर्ज किंवा निवेदन तयार करायचे आहे का?

# माझा पर्यावरणपूरक गणपती, माझी जबाबदारी' उपक्रमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश

### विश्व हिंदू जागृती फाउंडेशनतर्फे पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचे आवाहन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे : प्रतिनिधी

गणेशोत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करण्यासोबतच पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने विश्व हिंदू जागृती फाउंडेशनतर्फे 'माझा पर्यावरणपूरक गणपती, माझी जबाबदारी' हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. फाउंडेशनचे विश्वस्त प्रीतम थोरवे, नयन ठाकूर आणि प्रा. सानिका ठाकूर यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

गणेशोत्सव हा श्रद्धा आणि आनंदाचा उत्सव असून, त्यातून पर्यावरण संरक्षणाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न असल्याचे प्रीतम थोरवे




यांनी सांगितले. नागरिकांनी पर्यावरणपूरक गणेशमूर्ती, नैसर्गिक रंग आणि पर्यावरणस्नेही सजावटीचा वापर करावा, असे आवाहन करण्यात येणार आहे.

गणेशोत्सवातील निर्माल्य स्वतंत्रपणे संकलित करून त्याचे कंपोस्ट किंवा सेंद्रिय खतामध्ये रूपांतर करण्याबाबत जनजागृती केली जाणार आहे. तसेच नदी, तलाव किंवा समुद्रात विसर्जन करण्याऐवजी घरगुती अथवा कृत्रिम विसर्जन तलावांचा वापर करण्याचे आवाहन करण्यात येणार आहे. प्लास्टिकचा वापर कमी करणे, ध्वनीप्रदूषण टाळणे, ऊर्जाबचत करणे आणि गणेशोत्सवाच्या निमित्ताने वृक्षारोपण करून त्याची नियमित देखभाल करण्यासाठीही नागरिकांना प्रोत्साहित केले जाणार आहे.

श्रद्धा आणि परंपरा जपत असतानाच निसर्गाचेही संरक्षण झाले पाहिजे. बाप्पाच्या उत्सवामुळे पर्यावरणाची हानी होऊ नये, यासाठी प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखावी, असे थोरवे यांनी सांगितले.

पर्यावरणपूरक गणेशोत्सव केवळ उत्सवापुरता मर्यादित न ठेवता वर्षभर निसर्गसंवर्धनाची जबाबदारी स्वीकारण्याची गरज असल्याचे फाउंडेशनच्या वतीने सांगण्यात आले. यावेळी पराग देव, अमरनाथ देवळालीकर आणि ॲड. श्रीराम जोशी उपस्थित होते.

# सत्ता असूनही निधी नाही, आपण असे बोलल्यावर विरोधक फायदा घेणारच; मोहोळ यांनी घेतला नगरसेवकांचा समाचार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे । प्रतिनिधी

पुणे महापालिकेत सत्ता आपली आहे; मात्र अधिकारी नगरसेवकांचे ऐकत नाहीत. प्रभागातील कामे होत नाहीत. सर्वसाधारण सभेत बोलू दिले जात नाही. पदाधिकाऱ्यांनी काही अधिकाऱ्यांच्या डोक्यावरील हात काढला पाहिजे. तुम्ही त्यांना पाठीशी घालता, म्हणून आमची कामे होत नाहीत, अशा शब्दांत भाजपच्या नगरसेवकांनी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यासमोर नाराजीचा पाढा वाचून घरचा आहेर दिला. निवडून येऊन सहा-सात महिने झाले; मात्र नागरिकांना सांगता येईल अशी ठोस कामे होत नाहीत. जुन्या ठेकेदारांची मक्तेदारी आणि प्रभागातील राजकीय हस्तक्षेपाविरोधात नगरसेवकांनी आक्रमक भूमिका घेतल्याने भाजपमधील अंतर्गत धुसफूस पुन्हा चव्हाट्यावर आली आहे.

पुणे महापालिकेतील भाजप नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांमधील नाराजीबाबत केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या उपस्थितीत बैठक झाली. महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत प्रशासनाविरोधात सत्ताधाऱ्यांकडून ठोस भूमिका घेतली जात नसल्याचा नाही. आपण अधिकाऱ्यांना पाठीशी घालण्यासाठी सत्तेत बसलो आहोत का? काही वरिष्ठ अधिकारी उद्धटपणे बोलतात. शहर अभियंता दहा-दहा दिवस भेटत नाहीत. भेट झाली तरी कामे मार्गी लागत नाहीत. प्रशासनावर नेमका कोणाचा अंकुश आहे? असा सवाल नगरसेवकांनी उपस्थित केला.

निधी वाटपात दुजाभाव केला जात असून ठराविक नगरसेवक आणि प्रभागांना विशेष वागणूक दिली जाते आहे. वर्षानुवर्षे तेच ठेकेदार कामे घेत आहेत. त्यामुळे नवीन ठेकेदारांना संधी मिळत नाही. जुन्या ठेकेदारांची मक्तेदारी मोडून ही लॉबी उद्ध्वस्त केली पाहिजे, अशी मागणी नगरसेवकांनी केली. निविदांमधील वाद आणि कामांच्या वाटपावरून भाजप नगरसेवकांमध्ये यापूर्वीच नाराजी निर्माण झाली होती. या वादांचा परिणाम पक्षाच्या प्रतिमेवर आणि शहरातील विकासकामांवर होत असल्याची चिंता व्यक्त करण्यात आली. माझ्या प्रभागातील माजी नगरसेवक अजूनही महापालिकेच्या कामांमध्ये हस्तक्षेप करतात. अधिकाऱ्यांवर दबाव आणून आम्हाला काम करू दिले जात नाही, अशी तक्रार काही नगरसेवकांनी केली.

सत्ताधाऱ्यांसारखे वागा, विरोधकांना प्रत्युत्तर देण्यात अपयशी ठरता

आपण सत्तेत आहोत, या मानसिकतेतच दिसत नाही. पुणेकरांनी आपल्याला कौल दिला आहे. आपण पुणे महापालिकेतील सत्ताधारी आहोत, हे आधी मनाशी पक्के करा, अशा शब्दांत केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी नगरसेवकांना सुनावले. प्रभागातील कामे, निधी आणि अधिकाऱ्यांच्या तक्रारींपुरते मर्यादित न राहता पक्ष, संघटना आणि संपूर्ण शहराच्या राजकीय परिस्थितीचा विचार करण्याचा सल्लाही त्यांनी दिला. पाच वर्षांच्या कामांचे नियोजन करा. सर्वाधिक निधी मिळाला म्हणजे पुढील निवडणुकीत शंभर टक्के निवडून येणार, अशी हमी कोणी देऊ शकते का? .'प्रभागाच्या बाहेर जाऊन शहराचा विचार करा'. महापालिकेत सत्ता असूनही निधी मिळत नाही किंवा कामे होत नाहीत. आपणच असे बोलत बसलो, तर विरोधक त्याचा फायदा घेणार आहेत. 'बोलायला वेळ हवा; पण जीबीतील उपस्थिती किती?' सर्वसाधारण सभेमध्ये बोलण्याची संधी मिळत नसल्याच्या नगरसेवकांच्या तक्रारींचाही मोहोळ यांनी समाचार घेतला. पालिकेची सर्वसाधारण सभा दोन दिवस चालविण्याचा निर्णय झाला आहे.

## सारांश वृत्त

### मुलं बेपत्ता होतात, यंत्रणा कधी जागी होणार? अपहरण प्रकरणांच्या तपासासाठी सुप्रीम कोर्टाची केंद्र-राज्यांना नोटीस

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : वृत्तसंस्था

देशात मुलांच्या अपहरण आणि बेपत्ता होण्याच्या प्रकरणांमध्ये तपास यंत्रणांमध्ये एकसमानता नसणे, तपासाला होणारा विलंब आणि खटले वर्षानुवर्षे प्रलंबित राहणे यावर आता सर्वोच्च न्यायालयाने गंभीर दखल घेतली आहे. मुलांच्या अपहरण आणि बेकायदेशीररीत्या नेण्याच्या प्रकरणांचा तपास संपूर्ण देशभर एकसमान, विशेष पद्धतीने आणि ठरावीक कालमर्यादेत करण्याची मागणी करणाऱ्या जनहित याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी, १० सप्टेंबर रोजी केंद्र आणि राज्य सरकारांकडून उत्तर मागितले.

भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठाने केंद्र सरकार, सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना नोटीस बजावली. तसेच केंद्रीय शिक्षण मंत्रालय, कायदा व न्याय मंत्रालय, गृह मंत्रालय आणि विधी आयोगालाही या प्रकरणात भूमिका स्पष्ट करण्यास सांगण्यात आले आहे. ही जनहित याचिका अधिवक्ता आणि याचिकाकर्ते अश्विनी कुमार उपाध्याय यांनी दाखल केली आहे.

याचिकेत मुलांच्या अपहरणाच्या प्रकरणांसाठी राष्ट्रीय पातळीवर प्रमाणित तपास प्रोटोकॉल, विशेष प्रशिक्षित तपास पथके, तपासासाठी निश्चित कालमर्यादा आणि खटल्यांच्या जलद सुनावणीसाठी स्वतंत्र किंवा विशेष न्यायालयांची मागणी करण्यात आली आहे.

मुलांच्या अपहरणाच्या प्रत्येक प्रकरणात सुरुवातीचे काही तास अत्यंत महत्त्वाचे असतात. मात्र पोलिस यंत्रणांची कार्यपद्धती, तपासाची गती आणि उपलब्ध संसाधने यामध्ये राज्यनिहाय फरक असल्यास त्याचा थेट फटका पीडित मुलांना आणि त्यांच्या कुटुंबांना बसू शकतो. तपासात विलंब म्हणजे केवळ प्रशासकीय त्रुटी नाही; तो एखाद्या मुलाच्या सुरक्षिततेचा प्रश्न आहे.

# १० हजार विद्यार्थ्यांच्या हातांनी साकारला पर्यावरणपूरक बाप्पा

## पर्यावरणपूरक गणेशमूर्ती निर्मितीचा महाराष्ट्राच्या नावावर गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड; फडणवीस-मुंडेंनीही घडविली मूर्ती

■ दैनिक राज्य लोकतंत्र
ठाणे / वृत्तसंस्था

गणेशमूर्तीच्या भव्यतेपेक्षा भक्ती आणि पर्यावरण संवर्धनाला अधिक महत्त्व आहे. गणेशोत्सवासारखा सांस्कृतिक वारसा जपणारा सण पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

वाशी येथील सिडको एक्झिबिशन अँड कन्व्हेन्शन सेंटरमध्ये आयोजित 'पर्यावरणपूरक महा गणेश मूर्ती कार्यशाळा २०२६' मध्ये ते बोलत होते. या कार्यशाळेत एकाच वेळी १० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी शाडूच्या मातीपासून गणेशमूर्ती साकारत गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये महाराष्ट्राच्या नावावर नवा जागतिक विक्रम नोंदविला. मुख्यमंत्री फडणवीस आणि पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनीही विद्यार्थ्यांसोबत शाडूच्या मातीपासून गणेशमूर्ती घडवून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. या उपक्रमामुळे 'आपण स्वतः पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार करू शकतो', हा संदेश प्रत्यक्ष कृतीतून समाजापर्यंत पोहोचला.



फडणवीस म्हणाले, गणराया ही बुद्धीची देवता असून भारतीय संस्कृतीत पर्यावरणाला विशेष महत्त्व आहे. पंचमहाभूतांचे संरक्षण झाले तरच मानवी जीवन सुरक्षित राहू शकते. मोठ्या गणेशमूर्ती, प्लास्टर ऑफ पॅरिस आणि कृत्रिम रंगांमुळे जलस्रोतांचे नुकसान होते. त्यामुळे मूर्ती लहान असो वा मोठी, भक्ती मात्र सारखीच असते. ईश्वराचा आशीर्वाद मूर्तीच्या आकारावर नव्हे, तर पर्यावरण आणि समाजासाठी आपण करत असलेल्या निःस्वार्थ सेवेत आहे. गिनीज वर्ल्ड रेकॉर्डच्या परीक्षकांनी विक्रमाची घोषणा केल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी या यशाचे श्रेय सहभागी विद्यार्थ्यांना दिले. पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, पर्यावरण विभाग, जे. जे. स्कूल ऑफ आर्ट आणि कला संचालनालयाच्या प्रयत्नांचेही त्यांनी कौतुक केले. पंकजा मुंडे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना सांगितले की, शाडू मातीपासून बाप्पा घडविणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांनी स्वतःला 'वसुंधरा रक्षक' म्हणून सिद्ध केले आहे. संस्कृती जपत पर्यावरण रक्षणाचा संदेश घराघरात पोहोचविणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ढोल-ताशांच्या गजरात आणि मूर्तिकारांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यशाळेत विद्यार्थी, कला क्षेत्रातील तज्ज्ञ, प्राध्यापक आणि गणेशभक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले. या वेळी वनमंत्री गणेश नाईक, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम, आमदार मंदा म्हात्रे, आमदार रवींद्र फाटक, पर्यावरण विभागाच्या सचिव जयश्री भोज, नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील, महापालिका आयुक्त कैलास शिंदे, ठाणे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ आणि कला संचालनालयाचे संचालक डॉ. नितीन इंगळे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

## मुलांच्या सुरक्षेवरच 'मेटा'ची कसोटी! इन्स्टाग्रामवरील सीएसईएएम प्रकरणी एनसीपीसीआरसमोर अधिकाऱ्यांची चौकशी

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : प्रतिनिधी

जगातील सर्वात मोठ्या सोशल मीडिया कंपन्यांपैकी एक असलेल्या मेटाच्या इन्स्टाग्राम प्लॅटफॉर्मवर मुलांच्या लैंगिक शोषणाशी संबंधित सामग्रीच्या जाहिराती आल्याच्या गंभीर आरोपांमुळे आता कंपनीची जबाबदारी आणि तिच्या नियंत्रण यंत्रणेवरच मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या प्रकरणाच्या चौकशीसाठी मेटाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी बुधवारी, ९ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोग अर्थात एनसीपीसीआरसमोर हजेरी लावली.

एनसीपीसीआरने ३ जुलै रोजी माध्यमांमध्ये आलेल्या अहवालाची स्वतःहून दखल घेत या प्रकरणाची चौकशी सुरू केली होती. इन्स्टाग्रामवर बाल लैंगिक शोषण आणि अत्याचाराशी संबंधित सामग्री म्हणजेच सीएसईएएमशी निगडित जाहिराती कथितपणे कशा प्रसिद्ध झाल्या, याबाबत आयोगाने मेटाकडून स्पष्टीकरण मागितले होते. त्यानंतर आता कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष चौकशीसाठी बोलावण्यात आले आहे.

या सुनावणीदरम्यान नेमकी कोणती माहिती किंवा स्पष्टीकरण मेटाच्या अधिकाऱ्यांकडून मागण्यात आले, याचा तपशील अद्याप सार्वजनिक झालेला नाही. मात्र हा प्रकार केवळ एखाद्या आक्षेपार्ह जाहिरातीपुरता मर्यादित न राहता, अब्जावधी वापरकर्त्यांना सेवा देणाऱ्या डिजिटल प्लॅटफॉर्मच्या कंटेंट मॉडरेशन, जाहिरात तपासणी आणि बालसुरक्षा यंत्रणेच्या कार्यक्षमतेचा गंभीर प्रश्न बनला आहे.

विशेष म्हणजे, मेटा आपल्या प्लॅटफॉर्मवर बाल लैंगिक शोषणासंबंधी सामग्रीला परवानगी नसल्याचे सांगते. जाहिरातींची स्वयंचलित तसेच आवश्यकतेनुसार मानवी तपासणी केली जाते, असा कंपनीचा दावा आहे. तरीही अशा प्रकारची सामग्री जाहिरातींच्या माध्यमातून प्लॅटफॉर्मपर्यंत पोहोचत असेल, तर तपासणी यंत्रणा नेमकी कुठे अपयशी ठरली? हा सर्वात गंभीर प्रश्न आहे. मुलांच्या सुरक्षेचा विषय असताना केवळ जाहिराती हटवणे किंवा स्पष्टीकरण देणे पुरेसे ठरणार नाही. जाहिराती मंजूर होण्यापूर्वीची तपासणी, दोषी जाहिरातदारांवर कारवाई आणि भविष्यात अशा सामग्रीला प्रवेश रोखण्यासाठी मेटाने कोणती ठोस पावले उचलली आहेत, याची पारदर्शक माहिती देणे आता आवश्यक आहे. डिजिटल प्लॅटफॉर्मचा नफा मोठा असू शकतो; पण मुलांच्या सुरक्षेपेक्षा तो मोठा असू शकत नाही.

## मोदी-शी जिनपिंग भेटीत बर्फ वितळेल; पण व्यापारातील अविश्वास कायम!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली/बीजिंग : प्रतिनिधी

भारत आणि चीनमधील संबंधांमध्ये राजनैतिक पातळीवर पुन्हा संवाद वाढत असला, तरी त्याचे प्रतिबिंब दोन्ही देशांच्या व्यापार आणि गुंतवणुकीच्या संबंधांमध्ये अद्याप दिसत नाही. चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांचा या आठवड्यातील नवी दिल्ली दौरा दोन्ही देशांमधील राजनैतिक तणाव कमी करण्याच्या प्रक्रियेला वेग देऊ शकतो. मात्र व्यवसाय क्षेत्रातील अडथळे पाहता, सीमेवरील तणाव कमी झाला म्हणून आर्थिक अविश्वासही संपला आहे, असे चित्र नाही.

शी जिनपिंग यांचा हा भारत दौरा तब्बल सात वर्षांनंतरचा पहिला दौरा आहे. ऑक्टोबर २०२४ मध्ये रशियातील कझान येथे झालेल्या ब्रिक्स परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि शी जिनपिंग यांची भेट झाली होती. त्यानंतर दोन्ही देशांनी संवाद आणि संबंध सामान्य करण्यासाठी काही पावले उचलली आहेत. मात्र राजनैतिक पातळीवरील प्रगती आणि व्यावसायिक संबंधांतील वास्तव यामध्ये मोठी तफावत कायम आहे.

दोन्ही देशांतील कंपन्यांना आजही विविध अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे विश्लेषकांचे म्हणणे आहे. नियमांमुळे गुंतवणूक प्रकल्प रखडणे, व्यावसायिक व्हिसासाठी होणारा विलंब आणि औद्योगिक उपकरणांवरील निर्बंध यामुळे कंपन्यांच्या निर्णयक्षमतेवर परिणाम होत आहे. परिणामी, सरकारांमधील संवाद वाढत असला तरी उद्योगविश्वामध्ये सावधगिरीची भूमिका कायम आहे. भारतासाठी ही परिस्थिती विशेष महत्त्वाची आहे. चीन हा जगातील प्रमुख उत्पादन केंद्रांपैकी एक असून इलेक्ट्रॉनिक्स, यंत्रसामग्री, औषधनिर्मिती, सौरऊर्जा आणि विविध औद्योगिक घटकांसाठी भारतीय उद्योग मोठ्या प्रमाणावर चिनी पुरवठा साखळीवर अवलंबून आहेत. दुसरीकडे, भारताने राष्ट्रीय सुरक्षेच्या कारणांमुळे चिनी गुंतवणूक आणि तंत्रज्ञानाबाबत अधिक काटेकोर भूमिका घेतली आहे. याच ठिकाणी मोदी सरकारसमोर मूलभूत प्रश्न उभा राहतो राजनैतिक संबंध सुधारायचे असतील, तर आर्थिक संबंधांवरील संशय किती काळ कायम ठेवणार? राष्ट्रीय सुरक्षा आणि आर्थिक हितसंबंध यांच्यात संतुलन साधणे आवश्यक असले, तरी अस्पष्ट नियम आणि प्रशासकीय विलंब उद्योगांसाठी मोठा अडथळा ठरू शकतो. शी जिनपिंग यांच्या दौऱ्यात सीमा प्रश्नासोबतच व्यापार, गुंतवणूक, व्हिसा आणि पुरवठा साखळीवरील अडथळे चर्चेत येणे अपेक्षित आहे. मात्र केवळ नेत्यांची भेट, हस्तांदोलन आणि संयुक्त निवेदने पुरेशी ठरणार नाहीत.

भारत-चीन संबंधांतील खरी 'थॉ' राजनैतिक व्यासपीठावर नव्हे, तर उद्योगांच्या कार्यालयात आणि कारखान्यांच्या पुरवठा साखळीत दिसली तरच त्याला आर्थिक अर्थ प्राप्त होईल. सध्या तरी राजनैतिक बर्फ वितळण्याची चिन्हे आहेत; पण व्यवसायाच्या मैदानावर अविश्वासाची भिंत अजूनही उभी आहे.

## भाजपचा 'ओबीसी डीएनए'चा दावा फोल? काँग्रेस किंवा वंचित सोबत राहिल्यास चित्र असेल वेगळे

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मुंबई -बीड / प्रतिनिधी :

महाराष्ट्रात सध्या आरक्षणाचा प्रश्न अत्यंत संवेदनशील व निर्णायक टप्प्यावर पोहोचला असताना, महायुती सरकार आणि विशेषतः भाजप या मुद्द्याकडे गांभीर्याने पाहत नसल्याचा तीव्र आक्षेप आता ओबीसी घटकांतून नोंदवला जात आहे. ''ओबीसी हाच भाजपचा डीएनए आहे,'' असा दावा वारंवार करणाऱ्या भाजपने मराठा आरक्षणाच्या पेचप्रसंगात ओबीसींच्या हक्कांकडे दुर्लक्ष केल्याने समाजात मोठा असंतोष खदखदू लागला आहे. त्यामुळे आता पेशींचा सत्ताधाऱ्यावर विश्वास राहिला नाही भविष्यात ओबीसींनी आपली ताकद वंचितला सोबत घेऊन काँग्रेसच्या पाठीमागे उभी केली तर वेगळे चित्र निर्माण व्हायला वेळ लागणार नाही.

गेल्या विधानसभा निवडणुकीत ओबीसी समाजाने भाजपच्या पारड्यात भरभरून मते टाकून सत्तेचा मार्ग सुकर केला होता. मात्र, मराठा आरक्षणासंदर्भातील निर्णयांचा थेट फटका ओबीसींच्या राजकीय व सामाजिक अधिकारांना बसल्याची भावना समाजात बळावली आहे. ज्या घटकाने पक्षाला सत्तेवर बसवले, त्याच घटकाशी दुजाभाव केला जात असल्याची सार्वत्रिक खंत आता व्यक्त होत आहे.ओबीसींच्या हक्कांसाठी उभारली जाणारी आंदोलने सत्ताधारी यंत्रणेकडून दडपली जात असल्याचा थेट आरोप आंदोलकांकडून केला जात आहे अंतरवाली सराटी येथे ओबीसी आरक्षणाच्या संरक्षणासाठी उपोषणाला बसलेले ॲड. मंगेश ससाणे यांचे आंदोलन प्रशासकीय दबावाने मोडीत काढण्यात आले.

दुसरे ओबीसी हक्कांसाठी आवाज उठवणारे प्रा. लक्ष्मण हाके यांचा मोर्चा मध्येच अडवून सरकारने दडपशाहीचा मार्ग अवलंबल्याची संतप्त प्रतिक्रिया उमटली.भाजपच्या भूमिकेमुळे निर्माण झालेल्या अविश्वासामुळे ओबीसी समाजाला आता राजकीय पुनर्मांडणीची गरज भासत आहे. मराठा समाजही सरकारच्या निर्णयांवर समाधानी नाही आणि ओबीसींनाही डावलले गेले आहे, अशी विचित्र राजकीय कोंडी सध्या निर्माण झाली आहे.या पार्श्वभूमीवर ओबीसींनी आपली ताकद दाखवण्यासाठी भाजपची साथ सोडत काँग्रेससोबत हातमिळवणी करावी, असा एक प्रमुख मतप्रवाह पुढे येत आहे. काँग्रेस पक्षच घटनात्मक चौकटीत ओबीसींना न्याय मिळवून देऊ शकतो, असा विश्वास अनेकांकडून व्यक्त केला जात आहे. त्याचबरोबर, वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख ॲड. प्रकाश आंबेडकर यांनीही सातत्याने ओबीसींच्या हिताची ठाम मांडणी केली आहे. आंबेडकर या प्रक्रियेत पूर्ण ताकदीने सोबत आले, तर राज्यात एक नवा राजकीय समतोल उभा राहू शकतो, अशीही चर्चा जोर धरत आहे.सत्ता टिकवण्यासाठी ओबीसींचा वापर करून नंतर त्यांना वाऱ्यावर सोडणाऱ्या भाजपला राजकीय धडा शिकवण्यासाठी पक्षांतर आणि नव्या समीकरणांची जुळवाजुळव करणे अनिवार्य बनले आहे, अशा प्रतिक्रिया आता संपूर्ण राज्यातून उमटू लागल्या आहेत. ओबीसी आमचा लेणी आहे असे म्हणत भाजपाने वेळ साधून घेतली दुसरीकडे कोणाच्या ताटातलं देणार नाही म्हणत मराठा समाजाला ही झुलवत ठेवलं अशा परिस्थितीत विखुरला गेला असला तरी मोठ्या संख्येने असलेल्या ओबीसी समाजाची मोठी नाराजी निर्माण होत असल्याने आणि भाजप ओबीसींना गृहीत धरत असल्यामुळे हा तोंड दाबून बुक्क्याचा मार ओबीसींना सहन करावा लागत असल्याने ओबीसींनी काँग्रेस सारखा पर्याय निवडला तर भाजप वठणीवर यायला वेळ लागणार नाही अशा देखील प्रतिक्रिया उमटत आहेत

# आश्रमशाळांमध्ये 'सर्पदंश जनजागृती व प्रतिबंध अभियान'

## १९ ते २६ सप्टेंबरदरम्यान सर्पमित्र, तज्ज्ञ व आरोग्य विभागाच्या सहकार्याने जनजागृती

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मुंबई : प्रतिनिधी

आदिवासी विद्यार्थ्यांच्या आरोग्य आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने आदिवासी विकास विभागाच्या शासकीय व अनुदानित आश्रमशाळा, एकलव्य मॉडेल निवासी शाळा आणि वसतिगृहांमध्ये १९ ते २६ सप्टेंबर २०२६ या कालावधीत 'सर्पदंश जनजागृती व प्रतिबंध अभियान' राबविण्यात येणार आहे. सर्पदंश टाळण्यासाठी सुरक्षित वर्तन, आपत्कालीन परिस्थितीतील उपाययोजना आणि वेळेत वैद्यकीय उपचार घेण्याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात येणार असल्याची माहिती नाशिक आदिवासी विकास विभागाचे आयुक्त (प्र.) गोपीचंद कदम यांनी दिली.

आश्रमशाळा आणि वसतिगृहे प्रामुख्याने डोंगराळ, दुर्गम व वनक्षेत्रालगत असल्याने विद्यार्थ्यांचा साप, विंचू किंवा इतर वन्यजीवांशी संपर्क येण्याची शक्यता असते. त्यामुळे प्रतिबंधात्मक उपायांसोबत सर्पदंशाबाबत वैज्ञानिक जनजागृती करण्यावर अभियानात भर दिला जाणार आहे.

अभियानांतर्गत प्रत्येक शाळा व वसतिगृहात स्थानिक सर्पमित्र, सर्पतज्ज्ञ तसेच आरोग्य व वन विभागाच्या सहकार्याने किमान एक तासाचे जनजागृती सत्र घेण्यात येणार आहे. साप आढळल्यास सुरक्षित अंतर राखणे, शांतपणे दूर जाणे, सापाला पकडण्याचा किंवा मारण्याचा प्रयत्न न करणे, सर्पदंश झालेल्या व्यक्तीची हालचाल कमीत कमी ठेवणे आणि तातडीने जवळच्या आरोग्य केंद्रात दाखल करणे याबाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली जाईल. सर्पदंशाशी संबंधित अंधश्रद्धा व गैरसमज दूर करण्यासाठीही वैज्ञानिक माहिती देण्यात येणार आहे.

विभागाच्या डिजिटल स्टुडिओच्या माध्यमातून तज्ज्ञांची मार्गदर्शनपर सत्रेही आयोजित केली जाणार आहेत. महाराष्ट्र शासनाने १८ ऑगस्ट २०२६ रोजी सर्पदंशाचा अधिसूचित आजार म्हणून समावेश केला आहे. त्यामुळे सर्पदंशाच्या घटनांची वेळेत नोंद, निरीक्षण तसेच अपींळ-डपरज्ञश तशपो (अडत) उपलब्धता आणि साठवणूक केंद्रांची माहिती अद्ययावत ठेवण्याच्या सूचना संबंधित यंत्रणांना देण्यात आल्या आहेत.

दरम्यान, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अभियानादरम्यान शाळा किंवा वसतिगृहाच्या परिसरात जिवंत साप आणून प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे.

आपत्कालीन संपर्क यंत्रणा अद्ययावत ठेवण्याचे निर्देश

मुख्याध्यापक, अधीक्षक आणि परिचारिका यांनी जवळच्या आरोग्य संस्थेचे नाव व संपर्क क्रमांक, अडत उपलब्ध असलेल्या आरोग्य संस्थांची माहिती, आपत्कालीन वाहतूक व्यवस्था तसेच स्थानिक सर्पमित्रांचे संपर्क क्रमांक दर तीन महिन्यांनी अद्ययावत ठेवावेत. अभियानांतर्गत करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल संबंधित स्तरावर सादर करणेही बंधनकारक राहणार आहे.

आदिवासी विद्यार्थ्यांचे आरोग्य व सुरक्षितता ही विभागाची सर्वोच्च प्राथमिकता आहे. या अभियानामुळे दुर्गम भागातील विद्यार्थी व कर्मचाऱ्यांमध्ये सर्पदंशाबाबत योग्य माहिती निर्माण होऊन आपत्कालीन परिस्थितीत प्राण वाचविण्यास मदत होईल. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्यासाठीही हे अभियान महत्त्वपूर्ण ठरेल, असे गोपीचंद कदम यांनी सांगितले.

## वयाचा पुरावा अपुरा म्हणून बलात्काराचा गुन्हा संपत नाही! सुप्रीम कोर्टाचा महत्त्वपूर्ण निकाल

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : वृत्तसंस्था

पीडित मुलगी अल्पवयीन असल्याचे कायदेशीर निकषांनुसार सिद्ध करता आले नाही, त्यामुळे पॉक्सो कायद्यातील आरोप टिकला नाही, तरी बलात्काराचा गुन्हा सिद्ध होत असेल तर आरोपीला केवळ तांत्रिक कारणावरून सुटका देता येणार नाही, असा अत्यंत महत्त्वपूर्ण निकाल सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी, १० सप्टेंबर २०२६ रोजी दिला. न्यायमूर्ती प्रशांत कुमार मिश्रा आणि न्यायमूर्ती एन. व्ही. अंजारिया यांच्या खंडपीठाने हा निर्णय देताना सांगितले की, पॉक्सो कायद्याच्या कलम ३ अंतर्गत लैंगिक अत्याचाराचा आरोप आणि भारतीय दंड संहितेच्या कलम ३७६ अंतर्गत बलात्काराचा गुन्हा यांच्यात मूलभूत कृतीच्या पातळीवर साम्य असल्यास, केवळ कलम ३७६ अंतर्गत स्वतंत्र आरोप निश्चित केला नव्हता म्हणून आरोपीला कायदेशीर फायदा मिळू शकत नाही.

हे प्रकरण मेघालयातील प्यंचेमलांगी बरेह विरुद्ध स्टेट ऑफ मेघालय या खटल्यातून समोर आले. २०१९ मध्ये ईस्ट जैंतिया हिल्स येथे एका महिलेने आपल्या १३ वर्षांच्या मुलीवर बलात्कार झाल्याची तक्रार दाखल केली होती. त्यानंतर पॉक्सो कायद्याच्या कलम ३ आणि ४ तसेच भारतीय दंड संहितेच्या कलम ५०६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. खटल्यात १४ साक्षीदार तपासण्यात आले आणि ११ महत्त्वाची कागदपत्रे सादर करण्यात आली. पीडितेचे वय सिद्ध करण्यासाठी बाप्तिस्मा प्रमाणपत्राचाही आधार घेण्यात आला.

विशेष पॉक्सो न्यायालयाने आरोपीला पॉक्सो कायद्याच्या कलम ४ अंतर्गत २० वर्षांची सक्तमजुरी आणि पाच हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली होती. कलम ५०६ अंतर्गतही दोन वर्षांची शिक्षा झाली. मेघालय उच्च न्यायालयाने ही शिक्षा कायम ठेवली. त्यानंतर आरोपीने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. आरोपीच्या मुख्य युक्तिवादाचा केंद्रबिंदू पीडितेच्या वयाच्या पुराव्यावर होता.

सर्वोच्च न्यायालयाने मात्र एक महत्त्वाची कायदेशीर विभागणी केली. न्यायालयाने मान्य केले की पॉक्सो कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी पीडित व्यक्तीचे 'बालक' असणे सिद्ध करणे आवश्यक आहे आणि या प्रकरणात वय सिद्ध करण्यासाठी आवश्यक असलेली कायदेशीर प्रक्रिया पूर्णपणे पाळली गेली नव्हती. त्यामुळे पॉक्सो अंतर्गत दोषसिद्धी कायम ठेवता येणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

पण इथेच सर्वोच्च न्यायालयाने आरोपीला पूर्णपणे निर्दोष सोडण्यास नकार दिला. वैद्यकीय पुराव्यांमधून बलात्काराची घटना स्पष्टपणे सिद्ध होत असल्याचे न्यायालयाने नमूद केले. त्यामुळे केवळ पीडितेचे वय सिद्ध करण्यात तपास यंत्रणा अपयशी ठरली म्हणून बलात्काराच्या सिद्ध झालेल्या घटनेचा कायदेशीर परिणाम नाहीसा होऊ शकत नाही, असा न्यायालयाचा दृष्टिकोन होता. 'दोषी व्यक्तीला केवळ तांत्रिक त्रुटीमुळे सुटू देणे म्हणजे पीडितेला न्याय नाकारणे', असा स्पष्ट संदेश या निर्णयातून मिळतो.

या प्रकरणातील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे कलम ३७६ अंतर्गत स्वतंत्र आरोपच निश्चित करण्यात आला नव्हता. सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, आरोप निश्चित करताना ही तरतूद पर्यायी स्वरूपात समाविष्ट करणे खटला चालवणाऱ्या न्यायालयासाठी योग्य ठरले असते. मात्र आरोप निश्चित करण्यातील त्रुटी आपोआपच संपूर्ण खटला निष्फळ करत नाही.

यासाठी न्यायालयाने कलम ४६४, फौजदारी प्रक्रिया संहिता याचा आधार घेतला. आरोपातील चूक किंवा विशिष्ट आरोप निश्चित न केल्यामुळे दोषसिद्धी केवळ त्या कारणाने अवैध ठरत नाही, जोपर्यंत आरोपीला प्रत्यक्षात आपला बचाव करण्याची संधी नाकारली गेल्याचे किंवा 'न्यायाचा अपयश' झाल्याचे सिद्ध होत नाही.

त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने पॉक्सो कायद्यातील कलम ४ अंतर्गत दोषसिद्धी रद्द केली; मात्र आरोपीला बलात्काराच्या गुन्ह्यासाठी भारतीय दंड संहितेच्या कलम ३७६ अंतर्गत १० वर्षांची सक्तमजुरी आणि १० हजार रुपये दंड ठोठावला.

या निकालाचा व्यापक अर्थ स्पष्ट आहेतपासातील किंवा आरोपपत्रातील तांत्रिक चूक आणि प्रत्यक्ष लैंगिक गुन्ह्याचे अस्तित्व या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. बाल लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणात पीडितेचे वय सिद्ध करणे अत्यावश्यक असले, तरी वयाच्या पुराव्यातील त्रुटीमुळे प्रत्यक्ष सिद्ध झालेल्या बलात्काराकडे न्यायव्यवस्थेने डोळेझाक करू नये, हा या निर्णयाचा केंद्रबिंदू आहे. त्याचवेळी आरोपीला योग्य बचावाची संधी मिळाली आहे का, यालाही न्यायालयाने महत्त्व दिले आहे. त्यामुळे हा निर्णय केवळ कठोर शिक्षा देण्याचा नाही, तर तपास यंत्रणा आणि न्यायालयांनी तांत्रिक काटेकोरपणासोबत न्यायाच्या मूळ उद्देशालाही केंद्रस्थानी ठेवावे, असा महत्त्वपूर्ण कायदेशीर संदेश देणारा आहे.